निर्णय क्र. मविनिआ/माअअ/२०२२/अपील/०६/२०२२/०३२५ दिनांक-१९.०७.२०२२

| | |
|---|---|
| माहिती अधिकार अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | :२१.०४.२०२१ |
| जन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिल्याचा दिनांक | :२०.०५.२०२२ |
| प्रथम अपील प्राप्त झाल्याचा दिनांक | :१७.०६.२०२२ |
| प्रथम अपील निकाली काढल्याचा दिनांक | :१९.०७.२०२२ |

**समक्ष प्रथम अपीलीय अधिकारी**

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई**

**(माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ अंतर्गत.)**

**अपील क्र. ०६/२०२२**

**अपीलकर्ता:** श्री. अरूण वसंत वाळुंज

**विरुदध**

**प्रतिवादी :** जन माहिती अधिकारी, मविनिआ, मुंबई

**अपीलाचे तथ्य :-**

१) अपीलकर्ता यांनी दिनांक २१.०४.२०२२ रोजी माहिती अधिकार कायद्याअंर्तगत केलेला अर्ज आयोगाच्या कार्यालयास दिनांक २१.०४.२०२२ रोजी प्राप्त झाला. अपीलार्थी यांच्या दिनांक २१.०४.२०२२ रोजी माहिती अधिकार कायद्याअंर्तगत दाखल केलेल्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी समाधानकारक माहिती न पुरविल्यामुळे अपीलार्थी यांनी दिनांक १६.०६.२०२२ रोजी वरील अपील दाखल केले. (प्रथम अपील आयोगाच्या कार्यालयास दिनांक १७.०६.२०२२ रोजी प्राप्त झाले.)

२) प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दिनांक २०.०६.२०२२ रोजी नोटिस पाठवून दिनांक १२.०७.२०२२ रोजी सुनावणी आयोजीत केली. सुनावणी च्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व तत्कालीन जन माहिती अधिकारी हे दोन्ही हजर होते. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांनी मौखिक निवेदन सादर केले.

३) अपिलातील दस्तऐवज व निवेदनावरुन अपिलातील मुद्दे खालील प्रमाणे आहेत -

<u>मागितलेली माहिती:-</u>

श्रीमती हेमलता प्रमोद मोती यांनी कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांच्या खोट्या सह्या घेतलेल्या व खोटी माहिती दिलेल्या प्रकरणाबाबत केलेल्या अद्ययावत कार्यवाहीच्या कागदपत्रांची संपूर्ण छायांकित प्रत देण्यात यावी (कालावधी सन २००७ ते २०१९).

खोट्या सह्या वा खोटी माहिती दिलेले प्रकरण -

- Submitted salary slip on letter head of the Commission.
- Shown fake deduction on account of GPF/CPF.
- Put fake signature of Shri Ashok Parulekar as true copy of the salary slip.
- Put fake signature at place checked by.

<u>जन माहिती अधिकारी यांचे उत्तर :-</u>

The information has sought, kindly refer the Govt. of Maharashtra Notification No.संकिर्ण २०१२ / ८९ / प्र.क्र.४७ / सहा, दि.१७.१०.२०१४.
"The CIC and the Courts below that the details called for by the Petitioner i.e. copies of all memos issued to the third respondent, show cause notices and orders of censure / punishment etc. are qualified to be personal information as defined in clause (j) of section 8(1) of RTI Act. The performance of an employee/officer in an organization is primarily a matter between the employee and employer and normally those aspects are governed by the service rules which fall under the expression "personal information", the discloser of which would cause unwarranted invasion of privacy of that individual."

<u>प्रथम अपील दाखल करण्याचे कारण :-</u>

मी दि. २१.०४.२०२२ रोजी कार्यालयामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये माहिती मिळविण्यासाठी अर्ज सादर केला होता. सदर अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि. २०.०५.२०२२ रोजीच्या पत्रान्वये माहिती दिलेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती चूकीची आहे.

मी दि. २१.०४.२०२२ रोजीच्या अर्जान्वये श्रीमती मोती यांचेबद्दल त्यांना मिळालेली ज्ञापने, कारणे दाखवा नोटीस, शिक्षादेश इ. बाबत कोणतीही माहिती मागितलेली नाही. असे असतानाही जन माहिती अधिकारी यांनी चूकीची माहिती दिलेली आहे.

श्रीमती मोती यांना पदोन्नती, आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत दोन लाभ देण्यात आलेले आहेत. सदर लाभ देताना ज्ञापने, कारणे दाखव नोटीस, शिक्षादेश, विभागीय चौकशी व न्यायिक प्रकरण आहे किंवा नाही याची पडताळी करून पदोन्नती तसेच आश्वासित प्रगती योजनेचा लाभ दिला जातो.

श्रीमती मोती यांना पदोन्नती तसेच आश्वासित प्रगती योजनेचा लाभ दिलेला असल्यामुळे मी विचारलेली माहिती मला मिळणे अपेक्षित आहे.

Smt. Moti is a public servant. When one becomes a public servant, he/she in strict sense becomes a public servant and as such, every member of public, gets a right to know about his/her working, his/her honesty, integrity and devotion to duty. In fact, nothing remains personal while as far as the discharging of duty. A public servant continues to be a public servant for all 24 hours. Therefore, any conduct/ misconduct of a public servant even in private, ceases to be private. Such supply of information, at the most, may disclose how sincere or insincere the public servant is in discharge of his/her duty and the public has a right to know. The same would amount to reducing corruption and increasing the faith in the elected representatives.

श्रीमती मोती यांना पदोन्नती, आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत दोन लाभ देण्यात आलेले आहेत. सदर लाभ दिलेले असल्यामुळे मी विचारलेली माहिती मला मिळणे अपेक्षित आहे. तसेच सदर माहिती ही मला न्यायालयील प्रकरणासाठी हवी आहे.

**अपीलामध्ये निदर्शनास आलेले मुद्दे :-**

अपीलार्थी हे या आयोगातील माहिती अधिकारी / अवर सचिव आहेत व प्रतिवादीसुध्दा तेच आहेत करीता, तत्कालीन माहिती अधिकारी श्री प्रदिप मोहरे सदरहू माहिती अर्ज निकाली काढल्यामुळे त्यांना या प्रकरणातील सुनावणीस बोलविण्यात आले व संपूर्ण प्रकरण अपिलार्थी व श्री मोहरे यांच्या कडून समजून घेण्यात आले. या प्रकरणात सादर केलेल्या मौखिक निवेदनावरून व अपीलातील मुद्द्यावरून असे दिसून येते कि,

१. अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक २१.०४.२०२२ च्या माहिती अर्जात याच कार्यालयातील कक्ष अधिकारी श्रीमती हेमलता मोती यांच्या खोट्या सह्या घेतलेल्या व खोटी माहिती दिलेल्या प्रकरणाबाबत केलेल्या अद्ययावत कार्यवाहीच्या कागदपत्रांची संपूर्ण छायांकित प्रत मागणी केल्याचे प्रथम दर्शनी दिसून येत आहे.
२. तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या आदेशात महाराष्ट्र शासनाचे शासन परिपत्रक क्रमांक: संकिर्ण २०१२ / ८९ / प्र.क्र.४७ / सहा, दि.१७.१०.२०१४ नमूद करून वरील माहिती वैयक्तीक स्वरूपाची असून कलम ८(१) (j) अंतर्गत येत असल्याचे नमूद करून व्यक्तीच्या खाजगी पणाचे विनाकारण उल्लंघन करणारी होईल अशी आहे. तसेच त्यांचे आदेशात वरील उल्लेखीत शासन परिपत्रकाच्या मा. सर्वोच्च न्यायालयाने स्पेशल लिव्ह पिटीशन क्रमांक २७७३४ / १२ च्या निर्वाळ्यातील परिच्छेद १३ तील निरिक्षण नोंदले आहे.
३. या प्रकरणात अपिलार्थी यांनी प्रथमत: त्यांच्या माहितीमध्ये कार्यालयीन कार्यवाहीच्या विषयी विचारणा केलेली आहे आणि कार्यवाहीच्या कागदपत्रांची मागणी केल्याचे दिसून येते.
४. सदरहू अपिल निकाली काढतांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांना कलम ८(१) (j) प्रमाणे सदरहू अर्जातील मागणी हि माहिती उघड करण्यातून सूट यात मोडते किंवा नाही यावर निष्कर्ष काढणे गरजेचे वाटते.

वरील प्रकरणात उपस्थित झालेले मुद्दा क्रमांक ३ व ४ अन्वये कारण मिमांषा येणे प्रमाणे आहे-
जन माहिती अधिकारी यांनी काय कार्यवाही केली हि जन माहिती अधिकारी देण्यास बांधील नाही व अशा प्रकारची माहिती कलम ८(१) (j) अन्वये सूट आहे, वरील निष्कर्ष हा केंद्रिय माहिती आयोग यांच्या खालील निर्णयाप्रमाणे ते येणे प्रमाणे -

> The Hon'ble CIC in the matter of *Shri Madan lal Aswal and Dal Chand Vs. CPIO Municipal Corporation Delhi* (Decision dated 05.11.2008) held that *"The respondent has replied to the query about the ownership of the land and the responsibility of maintenance ………….. The appellant now wants to know why action of demolition has not been taken, before allotment which according to him was precondition. Though the respondents are well intentioned, reasons for actions or inaction of public authorities cannot be obtained unless they have been recorded by the public authority. The PIO cannot be expected to provide reasons unless they are recorded."*

तसेच अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती हि कलम ८(१) (j) नुसार हि माहिती व्यापक लोकहिताच्या संबंधाशी निगडीत नसून ती व्यक्तीच्या खाजगीपणाचे उल्लंघन होईल अशी असल्याकारणाने माहिती उघड करण्यातून देण्यात आलेली सूट या संदर्भाची असल्याचे दिसून येते.
म्हणून, या प्रकरणात महाराष्ट्र शासनाचे शासन परिपत्रक क्रमांक: संकिर्ण २०१२ / ८९ / प्र.क्र.४७ / सहा, दि.१७.१०.२०१४ लागू होते.
करीता तत्कालीन माहिती अधिकारी यांनी पारित केलेल्या आदेशात कोणत्याही प्रकारचे हस्तक्षेप करण्याची गरज वाटत नाही.
वर उल्लेख केलेल्या केंद्रिय माहिती अयोगाच्या निर्णयान्वये तसेच महाराष्ट्र शासनाचे शासन परिपत्रक क्रमांक: संकिर्ण २०१२ / ८९ / प्र.क्र.४७ / सहा, दि.१७.१०.२०१४ आणि मा. सर्वोच्च न्यायालयाने स्पेशल लिव्ह पिटीशन क्रमांक २७७३४ / १२ च्या निर्वाळ्यातील परिच्छेद १३ तील निरिक्षणान्वये सदर अपिल खारिज करून निकाली काढण्यात येत आहे.
प्रथम अपिलीय अधिकारी हे दिनांक १३.०७.२०२२ ते १५.०७.२०२२ या कालावधीत रजेवर असल्यामुळे सदरहू अपिल ४५ दिवसाच्या मुदतीच्या आत निकाली काढण्यात येत आहे.

**जर प्रथम अपीलीय अधिका-यांच्या उत्तराने आपले समाधान झाले नाही तर आपण राज्य माहिती आयुक्त, १३वा मजला, नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर, मुंबई- ४०० ०३२ येथे अपील दाखल करू शकता.**

<u>निर्णय</u>

अपिल खारिज करून निकाली काढण्यात येत आहे.

**(अनिलकुमार उके)**
**संचालक विधी (प्रभारी) तथा प्रथम अपिलीय अधिकारी**

प्रति,
श्री. अरूण वसंत वाळुंज,
बी/९०५, श्री लक्ष्मी रेसीडेन्सी,
ना. म. जोशी मार्ग,
भायखळा (प.), मुंबई-४०० ०२७.

**(अनिलकुमार उके)**
**संचालक विधी (प्रभारी) तथा प्रथम अपिलीय अधिकारी**